# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय आठवा

अर्जुन उवाच–
किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥१॥

मग म्हणे पार्थ । ऐकिलें का देवा । पुसिला सांगावा । अभिप्राय ॥१॥
सांगा मज येथें । कवण तें 'ब्रह्म' । 'कर्म' ऐसें नाम । कोणासी तें ॥२॥
'अध्यात्म' तें काय । कैसें 'अधिभूत' । कोण असे येथ । 'अधिदैव' ॥३॥
सर्व हि तें मज । आकळेल नीट । ऐसें सांगा स्पष्ट । करोनियां ॥४॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥२॥

'अधियज्ञ' काय । कोण तो ह्या देहीं । कळेना हें कांहीं । [1] अनुमानें ॥५॥
ओळखिती कैसें । सांगा तुम्हालागीं । स्थिरचित्त योगी । अंतकाळीं ॥६॥
चिंतामणीचिया । मंदिरीं साचार । झोंपला जो नर । भाग्यवंत ॥७॥
मग झोंपेंत हि । जें तो बरळेल । ते हि बोल [2] फोल । नव्हतील ॥८॥
तैसे पार्थाचे ते । ऐकतां चि शब्द । सहजें गोविंद । काय बोले ॥९॥
म्हणे पार्था, तुवां । [3] पुसिलें जें कांहीं । ऐक [4] लवलाहीं । बरवें तें ॥१०॥
कामधेनूचा तो । [5] वत्स धनंजय । ऐसें निःसंशय । वाटे मज ॥११॥
कृष्णरूप * कल्प–। वृक्षाची साउली । तयासी लाभली । निरंतर ॥१२॥

---

१ तर्कानें. २ खोटें ठरणार नाहीत. ३ विचारिलें. ४ सत्वर. ५ वासरू.
* परिशिष्ट पहा.

म्हणोनि सिद्धीस । जाती मनोरथ । नवल तें येथ । असे काय ।।१३।।
आपण तों व्हावें । जेव्हां कृष्ण-भक्त । तेव्हां चि तें चित्त । कृष्णमय ।।१४।।
मग *ऋद्धिसिद्धि । [1]सेविका होवोनि । राबती अंगणीं । संकल्पाच्या ।।१५।।
परी ऐसें प्रेम । अर्जुनाठायीं च । नांदतसे साच । अमर्याद ।।१६।।
म्हणोनि तयाच्या । कामना सकळ । सहजें सफळ । होती सदा ।।१७।।
ह्या चि साठीं पार्थ । निज-मनोगत । पुसेल निश्चित । आपणातें ।।१८।।
जाणोनि हें देवें । वाढोनि ठेविलें । पुढें ताट भलें । उत्तराचें ।।१९।।
करी स्तनपान । सान जें बालक । तयाची तों भूक । माता जाणे ।।२०।।
काय तें आपण । शब्दें दूध मागे । मग पाजूं लागे । माता त्यासी ।।२१।।
तैसें कृपावंत । गुरूचिया ठायीं । हें तों सर्व कांहीं । स्वाभाविक ।।२२।।
असो आतां ऐका । देव सर्वेश्वर । काय सविस्तर । बोलिला तें ।।२३।।

श्रीभगवानुवाच–।

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ।।३।।

म्हणे नाशिवंत । आकारीं [2]कोंदलें । परी जें [3]ना गळे । कोणे काळीं ।।२४।।
एऱ्हवीं तयाचें । ऐसें सूक्ष्मपण । स्वभावें गगन । जणूं वाटे ।।२५।।
परी नव्हे तैसें । तयाहूनि सूक्ष्म । जया देती नाम । *महाशून्य ।।२६।।
जें का [4]शून्याचिया । पदरा आंतून । घेतलें गाळून । अति सूक्ष्म ।।२७।।
अति सूक्ष्म तरी । न जाई गळून । चाळणीमधून । विज्ञानाच्या ।।२८।।
पार्था, ऐसें जें का । सूक्ष्माहूनि सूक्ष्म । तें चि पर 'ब्रह्म' । ओळखावें ।।२९।।
जन्मतां आकार । न जन्मे त्या संगें । सर्वथा न [5]भंगे । लोपतां तो ।।३०।।
ब्रह्माचा त्या नित्य । सहज स्वभाव । 'अध्यात्म' हें नांव । तयालागीं ।।३१।।
निर्मळ आकाशीं । नेणों कैशा रीती । मेघ उद्भवती । नाना रंगीं ।।३२।।
तैसे निराकार । शुद्ध ब्रह्माठायीं । उद्भवती पाहीं । एकाएकीं ।।३३।।
*महत्तत्त्वादिक । भूतभेदें किती । विविध आकृति । ब्रह्मांडाच्या ।।३४।।

---

१ दासी. २ भरून राहिलें. ३ झिरपत (नाश पावत) नाहीं. ४ आकाशाच्या. ५ नाश पावत नाही.

ब्रह्मभूमीमाजीं । * आदिसंकल्पाचा । अंकुर तो साचा । उगवतां ।।३५।।
* ब्रह्म-गोलकांचे । असंख्य आकार । सर्वे चि साचार । प्रकटती ।।३६।।
पाहतां दिसती । तया एकेकांत । बीजें असंख्यात । सामावलीं ।।३७।।
आणि तेथें जीव । किती होती जाती । तयांची गणति । करवेना ।।३८।।
मग अगणित । आदिसंकल्पांस । [1] ब्रह्मगोलकांश । जन्म देती ।।३९।।
असो, ऐसा वाढे । सृष्टीचा विस्तार । अर्जुना साचार । बहुवस ।।४०।।
परी असे पर–। ब्रह्म चि संचलें । सर्वत्र एकलें । दुजेवीण ।।४१।।
आणि जणूं नाना–। रूपत्वाचा पूर । लोटला अपार । तयाठायीं ।।४२।।
सम-विषमत्व । नेणों कैसें आलें । अकारण झालें । चराचर ।।४३।।
पाहूं जातां तेथें । लक्षावधि साचे । प्रकार योनींचे । [2] प्रसवत्या ।।४४।।
जीवभावाची जी । इतर पालवी । तयाची न ठावी । सीमा कोणा ।।४५।।
कैसें कवण हें । प्रसवे सकळ । पाहूं जातां मूळ । शून्य चि तें ।।४६।।
परी मूळीं कर्ता । न दिसे सर्वथा । शेवटीं नसतां । कारण हि ।।४७।।
माजीं कार्य चि तें । वाढूं लागे पार्था । देखें स्वभावतां । जेणें योगें ।।४८।।
कर्त्यांविण पाहीं । * अव्यक्ताचे ठायीं । भासमान होई । आकार हा ।।४९।।
ऐसा जो [3] व्यापार । तया पंडुसुता । बोलती तत्त्वतां । 'कर्म' ऐसें ।।५०।।

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ।।४।।

बोलती सर्वथा । जया अधिभूत । तें हि थोडक्यांत । सांगूं ऐक ।।५१।।
नभीं अभ्र जैसें । होय जाय पार्था । तैसी ज्याची [4] सत्ता । लटकीच ।।५२।।
आणि पाहूं जातां । नाहीं च जें साच । भासे जें उगाच । वरिवरी ।।५३।।
होवोनि एकत्र । पंचमहाभूतें । आणिती जयातें । [5] व्यक्तत्वासी ।।५४।।
भूतांचा आश्रय । करोनि जें असे । संयोगें च दिसे । भूतांचिया ।।५५।।
आणि वियोगें जें । टिके ना [6] क्षणैक । नामरूपादिक । ऐसें जें का ।।५६।।
'अधिभूत' ऐसें । तयालागीं नांव । जाण अधिदैव । * पुरुष तो ।।५७।।

---

*परिशिष्ट पहा. १ ब्रह्मांडाचे भाग. २ जन्म देणाऱ्या. ३ व्यवहार. ४ अस्तित्व. ५ दृश्यपणाला. ६ क्षणभर.

* गुणक्षोभिणीनें । निर्मिले जे भोग । घेई उपभोग । तयांचा जो ॥५८॥
असे जो का स्वामी । इंद्रिय-देशींचा । तेविं [1] चेतनेचा । प्रकाशक ॥५९॥
मावळतां देह । संकल्प-पक्षिया । जो का रहावया । होय वृक्ष ॥६०॥
परमात्मरूप । मुळांत एकला । असोनि वेगळा । झाला जो का ॥६१॥
अहंकार-निद्रा । लागोनियां जया । पडे धनंजया । भव-स्वप्न ॥६२॥
स्वप्नींचे व्यापार । मानोनि ते साच । होय जो वायां च । सुखीदु:खी ॥६३॥
जयालागीं देती । 'जीव' ऐसें नांव । देहीं 'अधिदैव' । तें चि जाण ॥६४॥
देहीं [2] देहभाव । पाववितो लय । तो मी येथें होय । अधियज्ञ ॥६५॥
आणि अधिदैव । तेविं अधिभूत । तें हि गा समस्त । मी चि आहें ॥६६॥
लावोनियां कस । पाहतां चोखाळ । ऐसें चि केवळ । जें का [3] हेम ॥६७॥
मग * हीणामाजीं । मिळोनियां जातां । नव्हे का तें पार्था । * डाकलग ॥६८॥
वस्तुतां हेमाचें । मळे ना शुद्धत्व । सर्वथा हीणत्व । पावे ना तें ॥६९॥
परी संबोधावें । तया डाकलग । जोंवरी संसर्ग । * किडाळाचा ॥७०॥
तैसे ते मद्रूप । अधिभूतादिक । धनंजया देख । सर्वथैव ॥७१॥
परी * अविद्येच्या । पदरें झांकले । तोंवरी वेगळे । मानावे ते ॥७२॥
तो चि अविद्येचा । फाटतां पदर । लोपला साचार । भेद-भाव ॥७३॥
मग एकरूप । जाहले आटोन । म्हणूं तरी दोन । होते केव्हां ! ॥७४॥
करोनियां जैसा । केसांचा गुंडाळा । तयावरी शिळा । * स्फटिकाची ॥७५॥
ठेवोनियां मग । पाहूं जातां तेथें । जणूं ऐसें वाटे । भंगली ती ॥७६॥
सारितां तें दूर । केसांचें गुंडाळें । [4] खंडत्व लोपलें । कोठें नेणों ॥७७॥
आतां सांगें काय । लावोनियां * डाक । सांधिलें स्फटिक–। शिळेलागीं ॥७८॥
केसांचिया संगें । भेदलीशी भासे । अखंड ती असे । मूळची च ॥७९॥
केंस ते बाजूस । सारोनि पाहतां । होती तैसी आतां । दिसूं लागे ॥८०॥
तैसा अहंभाव । लोपोनियां जातां । ऐक्य स्वभावतां । आधीं चि तें ॥८१॥
ऐसी जेथें लाभे । [5] प्रतीतीची खूण । पार्था, तो मी जाण । अधियज्ञ ॥८२॥

---

*परिशिष्ट पहा.   १ जीवनशक्तीचा; जाणिवेचा.   २ मी देह ही जाणीव.   ३ सोनें.
४ भंगलेपणा.   ५ अनुभवाची.

उद्देशें ज्या ऐसें । सांगितलें तुज । यज्ञ हे [१] कर्म-ज । सकळ हि ।।८३।।
तो हा सकळ हि । जीवांचा विसावा । ब्रह्म-सौख्य-ठेवा । अधियज्ञ ।।८४।।
करोनि उघड । परी तें चि आतां । दावितसें पार्था । तुजलागीं ।।८५।।
आधीं वैराग्याचें । घालोनि [२] इंधन । अग्नि पेटवोन । इंद्रियांचा ।।८६।।
शब्दादि विषय–। द्रव्याचिया देती । तयांत आहुति । धनंजया ।।८७।।
मग वज्रासन–। भूमि सारवोन । सर्वथा करोन । घेती शुद्ध ।।८८।।
*आधारमुद्रेची । *वेदिका बरवी । रचिती [३] मांडवीं । शरीराच्या ।।८९।।
तेथें संयमाच्या । अग्निकुंडीं जाण । *त्रिबंध-साधन–। मंत्र-घोषें ।।९०।।
इंद्रियद्रव्याच्या । विपुल आहुति । देवोनि करिती । यजन ते ।।९१।।
मग मन आणि । प्राणाचा संयम । हें जें सर्वोत्तम । होम-द्रव्य ।।९२।।
तेणें समारंभें । करिती संतुष्ट । धूमविरहित । ज्ञानाग्नीतें ।।९३।।
ऐसें सकळ हि । द्रव्य हें संपूर्ण । होतां समर्पण । ज्ञानामाजीं ।।९४।।
मग ज्ञान तें हि । हारपतां ज्ञेयीं । *ज्ञेय चि तें राही । स्वरूपें गा ।।९५।।
तया ज्ञेयासी च । नांव ‘अधियज्ञ’ । बोलिला सर्वज्ञ । ऐसें जंव ।।९६।।
तंव तो अर्जुन । अति बुद्धिमान् । तयानें ती खूण । आकळिली ।।९७।।
जाणोनि हें देव । बोले गा पांडवा । श्रवणीं बरवा । [४] दक्ष होसी ।।९८।।
ऐसा कृष्णदेव । होतां चि संतुष्ट । आनंदला पार्थ । पाहोनि तें ।।९९।।
तान्हया बाळाचें । भरतां चि पोट । तेणें चि संतुष्ट । स्वयें होणें ।।१००।।
किंवा शिष्याचिया । कृतकृत्यपणें । कृतार्थ मानणें । आपणांसी ।।१०१।।
हें तों सर्वथैव । जाणे सद्गुरु च । किंवा जाणे साच । जन्मदात्री ।।१०२।।
म्हणोनि *अष्ट हि । सात्त्विक भावांचा । समुदाय साचा । पार्थाआधीं ।।१०३।।
देवाचिया अंगीं । सामावे ना परी । तयें सांवरिली । निज-बुद्धि ।।१०४।।
मग [५] परिमळ । पिकल्या सुखाचा । [६] शीत अमृताचा । [७] कल्लोळ कीं ।।१०५।।
तैसा तो कोमल । आणि सु-रसाळ । बोलिला गोपाळ । तेथें बोल ।।१०६।।
म्हणे तुजऐसा । सर्वश्रेष्ठ श्रोता । नाहीं दुजा पार्था । येथें कोणी ।।१०७।।

---

*परिशिष्ट पहा. १ कर्मातून जन्मलेले. २ जळण. ३ मंडपांत. ४ तत्पर. ५ सुगंध. ६ निवालेलें. ७ लाट.

ऐकें, ऐसी माया । जळोनियां जातां । जाळितें तत्त्वतां । तें हि जळे ॥१०८॥

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥५॥

अर्जुना आतां चि । सांगितलें तूतें । बोलती जयातें । 'अधियज्ञ' ॥१०९॥
तया मातें जे का । जाणती आधीं च । आणिक तैसें च । अंतकाळीं ॥११०॥
मठालागीं जैसें । आकाश तें पाहें । व्यापोनियां राहे । अंतर्बाह्य ॥१११॥
[१] ठेले आत्मरूप । होवोनि ते पाहें । देह मिथ्या ऐसें । मानोनियां ॥११२॥
तयां प्रतीतीच्या । माजघरीं साची । जागा निश्चयाची । प्राप्त झाली ॥११३॥
बाह्य विषयांचा । म्हणोनि विसर । पडला साचार । तयांलागीं ॥११४॥
ह्यापरी सबाह्य । भोगोनि एकता । होवोनि राहतां । मद्रूप ते ॥११५॥
बाहेरी पांच हि । भूतांचीं *खवलें । गळतां न कळे । तयांसी तें ॥११६॥
असतां देहाचें । आतां उभेपण । तयाचें तों भान । नाहीं जयां ॥११७॥
पडतां तो देह । तयाचें [२] सांकडें । काय तरी पडे । तयांलागीं ? ॥११८॥
म्हणोनि तयांची । [३] स्वरूपानुभूति । ढळे ना कल्पान्तीं । धनंजया ॥११९॥
ऐक्यरसाची च । जणूं ती ओतली । हृदयीं घातली । [४] नित्यतेच्या ॥१२०॥
[५] सामरस्याचिया । जणूं सागरांत । काढिली निभ्रांत । धुवोनि ती ॥१२१॥
म्हणोनियां काम–। क्रोधादि सकळ । तेथें मनोमळ । राहती ना ॥१२२॥
अथांग उदकीं । बुडतां चि घट । उदक तें आंत । बाहेर हि ॥१२३॥
मग दैवगत्या । पावतां तो भंग । भंगतें का सांग । उदक तें ? ॥१२४॥
उष्मा होतां कोणी । वस्त्र केलें दूरी । टाकिली ना तरी । कात सर्पें ॥१२५॥
तरी आतां सांग । अर्जुना साचार । भंगलें शरीर । काय तेथें ॥१२६॥
तैसा नाशिवंत । मिथ्या हा आकार । पावला साचार । जरी लोप ॥१२७॥
तरी नित्य ब्रह्म । शाश्वत एकलें । सर्वत्र संचलें । ओतप्रोत ॥१२८॥
आतां बुद्धि तें चि । जाहली निजांगें । तरी कैसी [६] डगे । अंतकाळीं ॥१२९॥
म्हणोनि अंतरीं । अंतकाळीं मज । जाणोनि सहज । ऐशा रीती ॥१३०॥

---

*परिशिष्ट पहा. १ राहिले. २ संकट. ३ आत्मानुभव. ४ अखंडपणाच्या. ५ ऐक्याच्या.
६ चळेल; डगमगेल.

राहोनि सावध । सोडिती जे देह । होती नि:संदेह । मद्रूप ते ।।१३१।।
नाहीं तरी ज्याचें । जैसें जो जो करी । स्मरण अंतरीं । अंतकाळीं ।।१३२।।
तया तैसी ती च । लाभे गति साच । संदेह नाहीं च । येथें कांहीं ।।१३३।।
जैसा दीनवाणा । कोणी एक पार्था । धांवतां पळतां । वायुवेगें ।।१३४।।
होवोनि बेभान । दुर्दैवें अवचित । पडावा [१] कूपांत । महाघोर ।।१३५।।
ऐशा स्थितीमाजीं । टाळाया पतन । नाहीं च साधन । तयापाशीं ।।१३६।।
घसरतां पाय । [२] नावरोनि वेग । पडणें चि भाग । पडे तया ।।१३७।।
तैसें अंतकाळीं । जीवापुढें राहे । जी जी वस्तु पाहें । धनुर्धरा ।।१३८।।
तद्रूप सर्वथा । तया व्हावें लागे । चुके ना तें ओघें । आलें जें जें ।।१३९।।
ज्याचा [३] निदिध्यास । घ्यावा जागृतींत । झोंपतां स्वप्नांत । तें चि दिसे ।।१४०।।

यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावित: ।।६।।

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्य संशय: ।।७।।

तैसें जन्मभरी । जीवा ज्याचें ध्यान । आवडीनें मन । रमे जेथें ।।१४१।।
तें चि अंतकालीं । होवोनियां फार । व्यापोनि [४] अंतर । राहतसे ।।१४२।।
आणि अंतकालीं । जया जें आठवे । ती च गति पावे । सर्वथा तो ।।१४३।।
म्हणोनियां तुवां । सदा सर्वकाळ । मातें चि केवळ । आठवावें ।।१४४।।
पाहावें नयनीं । ऐकावें जें कानीं । कल्पावें जें मनीं । धनंजया ।।१४५।।
आणि जें जें कांहीं । मुखें उच्चारावें । तें तें सर्व व्हावें । मद्रूप चि ।।१४६।।
मग स्वभावतां । निरंतर एक । सर्वकाळीं देख । मी चि आहें ।।१४७।।
पडे जरी देह । मग ऐसें होतां । साच पाहूं जातां । मरे ना तो ।।१४८।।
तरी धनंजया । आतां सांगें मज । भय काय तुज । संग्रामाचें ।।१४९।।
माझिया स्वरूपीं । बुद्धि आणि मन । होतां समर्पण । सर्वभावें ।।१५०।।
सर्वथा मातें चि । पावसी नि:शंक । हे गा माझी [५] भाक । पंडुसुता ।।१५१।।

---

१ विहिरींत.   २ न आवरल्यानें.   ३ सतत चिंतन.   ४ चित्त; अंत:करण.   ५ आश्वासन; वचन.

घडेल हें कैसें । ऐसें तुझें मन । आशंका घेवोन । विचारील ॥१५२॥
तरी पहावें हें । अभ्यासूनि चांग । न हो तरी मग । [1] रागेजावें ॥१५३॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन् ॥८॥

ऐशा अभ्यासाशीं । चित्ताची बरवी । सांगड घालावी । धनुर्धरा ॥१५४॥
प्रयत्नाचे बळें । पांगळा हि पार्था । [2] गिरीचिया माथां । चढूं शके ॥१५५॥
तेविं * परात्पर–। पुरुष-चिंतन । करीं रात्रंदिन । सोऽहंभावें ॥१५६॥
मग तुझा देह । जावो किंवा राहो । तुज मृत्यु न हो । कल्पान्तीं हि ॥१५७॥
पाववी जें चित्त । नाना [3] गतींप्रति । वरील तें अंतीं । आत्मयातें ॥१५८॥
मग पार्था, देह । गेला किंवा आहे । सांग कोण पाहे । आठवोनि ॥१५९॥
नदीचिया ओघें । घोघावलें पाणी । मिळालें जावोनि । सिंधु-जळा ॥१६०॥
मग मागें काय । घडे तें पहाया । सांग धनंजया । वळे का तें ? ॥१६१॥
तें तरी सिंधूसि । मिळोनियां गेलें । होवोनियां ठेलें । सिंधुरूप ! ॥१६२॥
तैसें चित्ताचें त्या । जाहलें चैतन्य । होतां चि अनन्य । चैतन्याशीं ॥१६३॥
जन्ममरणाचा । नाहीं जेथें शीण । असे परिपूर्ण । आनंदें जें ॥१६४॥

कविं पुराणमनुशासितार–
मणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।
सर्वस्य धातारमचिन्त्यरूप–
मादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥९॥

जयालागीं जाण । जन्म ना मरण । आकारावांचोन । असे जें का ॥१६५॥
जें का सर्वव्यापी । सर्वपणें पाहे । [4] पुराणें जें आहे । नभाहून ॥१६६॥
* परमाणुहून । अर्जुना जें सान । ऐसें सूक्ष्माहून । सूक्ष्म जें का ॥१६७॥
जयाच्या सन्निध्यें । विश्वाचे व्यापार । चालती साचार । [5] अव्याहत ॥१६८॥
जेणें योगें होय । सर्व हें निर्माण । विश्वाचें जीवन । असे जें का ॥१६९॥
न ये अनुमान । करावया ज्याचें । [6] अचिंत्य जें साचें । धनुर्धरा ॥१७०॥

---

*परिशिष्ट पहा.　१ रागवावें.　२ पर्वताच्या.　३ गतींना.　४ जुनें.　५ न थांबतां; अखंड.
६ विचाराच्या पलीकडचें.

वाळवी खाई ना । निखाऱ्यातें जैशी । शिरे ना प्रकाशीं । अंधकार ॥१७१॥
तैसें दिसे ना जें । [1]चर्मचक्षूलागीं । जरी झाला जगीं । सूर्योदय ॥१७२॥
असंख्य सूर्यांची । जणूं स्वच्छ रास । नित्य ज्ञानियांस । प्रत्यक्ष जें ॥१७३॥
अस्तमानाचें तों । जया नाहीं नांव । स्वभावें सदैव । प्रकाशे जें ॥१७४॥

> प्रयाणकाले मनसाऽचलेन
> भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।
>
> भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्
> स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥१०॥

तया परिपूर्ण । ब्रह्मातें जाणोन । आठवी [2]प्रयाण–। कालीं जो का ॥१७५॥
अंतरीं एकाग्र । करोनियां मन । बाहेरी रचोन । *पद्मासन ॥१७६॥
[3]उत्तराभिमुख । बैसोनियां देख । जीवीं योग-सुख । सांठवोनि ॥१७७॥
मेळवोनि आंत । सर्व मनोधर्म । ठेवोनियां प्रेम । स्वरूपीं च ॥१७८॥
आपुली आपण । घ्यावयासी भेट । झाला उत्कंठित । योगी जो का ॥१७९॥
तयाचा तो प्राण । *अग्निचक्राहून । मध्यमार्गें जाण । *सुषुम्नेच्या ॥१८०॥
निघे * ब्रह्मरंध्रीं । शिरावया, तेथ । [4]मूर्धन्याकाशांत । संचरे तो ॥१८१॥
देहाशीं संबंध । जीवचैतन्याचा । मग दिसे साचा । वरिवरी ॥१८२॥
मनाचें संपूर्ण । साधोनियां स्थैर्य । करोनि हृदय । भक्तियुक्त ॥१८३॥
योगबळें सिद्ध । राहिला होवोन । ठेवोनियां प्राण । *भ्रू-मध्यांत ॥१८४॥
घंटेंत चि लय । पावे घंटानाद । तैसें जडाजड । विरवी [5]जो ॥१८५॥
जैसा घटाखालीं । झांकला जो दिवा । कळे ना तो केव्हां । काय झाला ॥१८६॥
तैशा रीती ठेवी । अर्जुना जो देह । होय निःसंदेह । मद्रूप तो ॥१८७॥
परम पुरुष । ऐसें जया नाम । जो मी परब्रह्म । केवळ गा ॥१८८॥

> यदक्षरं वेदविदो वदन्ति
> विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।
>
> यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति

---

१ बाह्य दृष्टीला.　२ देह ठेवतांना.　३ उत्तरेकडे तोंड करून.　४ मस्तकांतील आकाशांत.　५ जो प्राण.

तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥११॥

सर्व ज्ञानामाजीं । जें का श्रेष्ठ ज्ञान । तयाची जे खाण । स्वयें होती ॥१८९॥
ऐसे महा-ज्ञानी । जयासी साचार । बोलती 'अक्षर' । ऐशा नांवें ॥१९०॥
[1] झंझावातें मेघ । उडोनियां जाय । परी मोडे काय । गगन तें ? ॥१९१॥
तैसें ज्ञानें जें जें । आकळिलें जाय । म्हणूं ये तें काय । [2] चिरंतन ॥१९२॥
मग अविनाश । नेणवे जें कांहीं । अक्षर तें पाहीं । स्वभावें चि ॥१९३॥
[3] क्षरे ना म्हणोनि । वेदवेत्ते नर । बोलती अक्षर । जयालागीं ॥१९४॥
परब्रह्मरूप । जें का मायातीत । जयातें * विरक्त । अपेक्षिती ॥१९५॥
विषयांचें विष । सांडोनि सकळ । करोनि निर्मळ । सर्वेंद्रियें ॥१९६॥
देहवृक्षातळीं । बैसोनियां वाट । जयाची पहात । निरंतर ॥१९७॥
प्रपंचीं निष्काम । जाहले जे पार्था । तयांसी सर्वथा । इष्ट जें का ॥१९८॥
आणि जयाचिया । आवडीनें देख । * ब्रह्मचर्यादिक । संकटें हि ॥१९९॥
[4] लेखिती ना मन । करोनि कठिण । साधिती दमन । इंद्रियांचें ॥२००॥
ऐसें जें का पद । दुर्लभ अगाध । वेद ते हि मुग्ध । झाले जेथें ॥२०१॥
* तत्पदीं विलीन । होती ते साचार । ठेविती शरीर । ह्यापरी जे ॥२०२॥
तरी ती च स्थिति । पुन्हां एकवेळ । सांगतों सकळ । तुजलागीं ॥२०३॥
तेव्हां पार्थ म्हणे । प्रभो चक्रपाणी । ऐसें चि हें मनीं । होतें माझ्या ॥२०४॥
तंव कृपा केली । सहजें आपण । तरी निवेदन । करावें जी ॥२०५॥
परी बोलणें तें । असावें [5] सुगम । आकळेल मर्म । जेणें मज ॥२०६॥
तंव काय बोले । त्रैलोक्याचा दीप । परमात्मरूप । नारायण ॥२०७॥
म्हणे पार्था, तुज । काय त्याची चिंता । सुखें ऐक आतां । सारांशें तें ॥२०८॥
विषयांच्या ठायीं । लागे अति ओढ । मनाची ही खोड । स्वाभाविक ॥२०९॥
तयासी अभ्यासें । वळवोनि आंत । बुडे हृदयांत । ऐसें करीं ॥२१०॥

सर्व द्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मन: प्राणमास्थितो योगधारणाम् ॥१२॥

---

१ वादळी वाऱ्याने. २ चिरकाल टिकणारे. ३ नाश पावत नाहीं. ४ जुमानीत नाहींत.
५ कळावयास सोपें.

इंद्रियांचीं द्वारें । करोनियां बंद । मनातें निर्बंध । घालोनियां ॥२११॥
होईल अखंड । संयमी जीवन । तरी च हें जाण । घडेल गा ॥२१२॥
पार्था, जैसा [1] पंगु । राहे जाग्यावरी । कोंडलें अंतरीं । तैसें मन ॥२१३॥
मग तें तेथें चि । राहेल निवांत । स्थिरावेल चित्त । स्वभावतां ॥२१४॥
शांतचित्तें मग । ॐकारीं [2] संलग्न । [2] करावा तो प्राण–। वायु पार्था ॥२१५॥
सुषुम्नेच्या मार्गें । मूर्धन्याकाशांत । आणोनियां तेथ । धनंजया ॥२१६॥
अकार उकार । मकार ह्या तीन । मात्रा होती लीन । * अर्धबिंबीं ॥२१७॥
तोंवरी धरावा । * धारणेच्या बळें । शून्यामाजीं मिळे । न मिळे ऐसा ॥२१८॥
मग तो [3] समीर । [4] शून्यीं होतां स्थिर । विराजे ॐकार । जैसा बिंबीं ॥२१९॥

ॐमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥१३॥

पूर्ण झालें तेथें । ॐकार-स्मरण । लीन होतां प्राण । महाशून्यीं ॥२२०॥
* प्रणवान्तीं मग । सहज संपूर्ण । उरे महाशून्य । एकलें चि ॥२२१॥
म्हणोनि ॐकार । एक जया नाम । एकाक्षरी ब्रह्म । असे जें का ॥२२२॥
तें चि माझें श्रेष्ठ । रूप आठवोनि । ह्यापरी [5] निदानीं । ठेवी देह ॥२२३॥
ज्याहून आणिक । नाहीं दुजी प्राप्ति । मद्रूपाची स्थिति । ऐसी जी का ॥२२४॥
ती तो पावे पार्था । स्वभावें निःशंक । माझ्या ठायीं एक–। रूप होतां ॥२२५॥
होईल स्मरण । कैसें अंतकाळीं । ऐसी तुज आली । शंका जरी ॥२२६॥
जीविताचें सुख । बुडोनियां जाय । खळबळ होय । इंद्रियांची ॥२२७॥
मग अंतर्बाह्य । मृत्यूचीं लक्षणें । दिसतां बैसणें । घडे कोणा ॥२२८॥
आणि शांतचित्तें । तेव्हां कैसें कोणीं । धरावें रोधूनि । इंद्रियांतें ॥२२९॥
प्रणवैकनाम । आठवावें चित्तीं । कैसें कोणा अंतीं । सुचावें हें ॥२३०॥
तरी ऐकें ऐशा । संशयातें वीरा । नको देऊं थारा । मनामाजीं ॥२३१॥
नित्य नेमें मज । [6] उपासी जो साच । अंतीं त्याची मी च । करीं सेवा ॥२३२॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।

---

*परिशिष्ट पहा. १ पांगळा. २ मिळवून टाकावा. ३ वायु. ४ आकाशांत. ५ अंतकालीं. ६ भजतो.

तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥१४॥

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥१५॥

सर्व *प्रवृतींतें । पार्था, निरोधून । विषयां देवोन । *तिळांजळी ॥२३३॥
नित्य माझें सुख । भोगिती जे भक्त । मातें हृदयांत । सांठवोनि ॥२३४॥
भोग-समाधानीं । होवोनि तल्लीन । जाती विसरोन । क्षुधा-तृषा ॥२३५॥
तेथें जीं बापुडीं । नेत्रेंद्रियादिक । तयांचा तों [१] लेख । कोण करी ॥२३६॥
ऐसे अंतरीं जे । जाहले तल्लीन । माझ्या ठायीं पूर्ण । सामरस्यें ॥२३७॥
उपासिती मातें । होवोनियां मी च । ऐसे जे का साच । भक्त माझे ॥२३८॥
स्मरावें तयांनीं । अंतकाळीं मातें । मग मी तयांतें । उद्धरावें ॥२३९॥
ऐसें म्हणू तरी । थोरवी ती काय । राहिली *अद्वय-। उपास्तीची ॥२४०॥
पाहें कोणी रंक । सांपडे संकटीं । धांव गा श्रीपती । ऐसें म्हणे ॥२४१॥
मज काकुळती । येतां चि शरण । तेथें मी धांवोन । न जाईं का ? ॥२४२॥
अधिक तें काय । करोनियां भक्ति । जरी ती च स्थिति । भक्तांची हि ॥२४३॥
म्हणोनियां शंका । नको मनीं ऐसी । आठवण कैसी । होय अंतीं ॥२४४॥
अर्जुना, तयांनीं । मज आठवावें । तेव्हां चि पावावें । तयांसी मीं ॥२४५॥
हा हि बोल पार्था । साहवेना मातें । रक्षितों भक्तांतें । निरंतर ॥२४६॥
निरंतर [२] ऋणी । भक्ताचा मी पाहीं । व्हावें उतराई । अंशमात्र ॥२४७॥
म्हणोनि [३] निजांगें । करीं [४] परिचर्या । पार्था तयाचिया । अंतकाळीं ॥२४८॥
[५] देह-वैकल्याचा । तया सुकुमारा । न लागावा वारा । म्हणोनियां ॥२४९॥
आत्मबोधाचिया । पिंजऱ्यामाझारीं । ठेवितों मी करीं । धरोनियां ॥२५०॥
तयावरी माझ्या । स्मरणाची भली । शीतल साउली । करीतसें ॥२५१॥
ऐशापरी तया । नित्य निरंतर । माझ्या ठायीं स्थिर-। बुद्धि देईं ॥२५२॥
म्हणोनियां पार्था । देहान्तींची [६] व्यथा । बाधे ना मद्भक्तां । कल्पान्तीं हि ॥२५३॥
तयां मद्रूपासी । सुखें चि मी आणीं । *देह-गवसणी । फेडोनियां ॥२५४॥

---

*परिशिष्ट पहा. १ पर्वा. २ उपकृत; देणेदार. ३ स्वतः ४ सेवा. ५ देहाच्या दुर्बळपणाचा.
६ दुःख; क्लेश.

[1] मिथ्या अहंतेची । झाडोनियां धूळ । वासना निर्मळ । करोनियां ॥२५५॥
आपुल्या स्वरूपीं । मेळवितों त्यांतें । भजती जे मातें । सर्वभावें ॥२५६॥
असोनियां देही । पार्था, माझे भक्त । देहीं ना आसक्त । [2] लेशमात्र ॥२५७॥
म्हणोनियां तयां । तनु-त्यागीं देख । होत नाहीं दु:ख । वियोगाचें ॥२५८॥
किंवा देहान्तीं च । धावोनियां यावें । मग तयां न्यावें । मद्रूपातें ॥२५९॥
हें हि घडे ना कीं । मरणा आधीं च । मद्रूप ते साच । स्वभावें चि ॥२६०॥
चंद्रिका ती राहे । चंद्राचिया ठायां । जरी पडछाया । दिसे जळीं ॥२६१॥
तैसा जरी भक्त । दिसे देहधारी । तरी तो अंतरीं । मद्रूप चि ॥२६२॥
ऐसे नित्ययुक्त । जे का माझे भक्त । तयांसी [3] संतत । सुलभ मी ॥२६३॥
म्हणोनि स्वभावें । अर्जुना देहान्तीं । मद्रूप ते होती । निश्चयेंसीं ॥२६४॥
मग क्लेशरूप । वृक्षांची च बाग । * त्रितापांची आग । ऐसें जें का ॥२६५॥
जें का मृत्यूरूप । कावळ्याचें अन्न । करी जें निर्माण । दैन्य-दु:ख ॥२६६॥
महाभयासी जें । पोषी सर्वकाळ । पुरें भांडवल । दु:खाचें जें ॥२६७॥
दुर्मतीचें मूळ । कुकर्माचें फळ । स्वरूप केवळ । व्यामोहाचें ॥२६८॥
सर्व विकारांचें । जें का उपवन । असे जें आसन । संसाराचें ॥२६९॥
सर्व हि व्याधींचें । वाढलें जें ताट । काळाचें उच्छिष्ट । अन्न जें का ॥२७०॥
जन्ममरणाचें । करी जें पोषण । [4] मूर्त आशा जाण । असे जें का ॥२७१॥
असे जें भ्रांतीनें । भरोनि राहिलें । तेविं जें ओतलें । विकल्पाचें ॥२७२॥
पार्था, सर्वथैव । व्याघ्राचें जें गांव । किंबहुना पेंव । विंचवांचें ॥२७३॥
* विषय-विज्ञान । -यंत्र जें महान् । सख्य-प्रदर्शन । [5] गणिकेचें ॥२७४॥
विषरूपी शीत । उदकाचा घोट । किंवा माया दाट । डाकिणीची ॥२७५॥
सभ्य चोराचिया । विश्वासाची प्राप्ति । किंवा दृढ मिठी । कोडियाची ॥२७६॥
काळसर्पाचें जें । पार्था, मृदुपण । सहज गायन । पारध्याचें ॥२७७॥
किंवा जैसी कोणी । पाहुणा म्हणोनि । घ्यावी मेजवानी । वैरियाची ॥२७८॥
किंवा जणूं केला । दुर्जनें सत्कार । नातरी आगर । अनर्थाचें ॥२७९॥

---

* परिशिष्ट पहा.　१ खोट्या देहाभिमानाची.　२ थोडेहिं.　३ नेहमीं.　४ मूर्तिमंत.　५ वेश्येचें.

स्वप्नामाजीं जें का । देखियेलें स्वप्न । बहरलें वन । मृगजळें ।।२८०।।
धूम्र-कणांचें जें । ओतलें गगन । ऐसें पार्था, जाण । शरीर हें ।।२८१।।
ऐशा शरीराची । तयां नाहीं प्राप्ति । मद्रूप जे होती । अमर्याद ।।२८२।।

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ।।१६।।

जरी वाटे थोर । ब्रह्मलोक-प्राप्ति । तरी चुके ना ती । [1] यातायात ।।२८३।।
परी झाला ज्याच्या । देहाचा शेवट । दुखे चि ना पोट । त्याचें जैसें ।।२८४।।
किंवा स्वप्नांतील । महापूरें साच । बुडे ना कोणी च । जाग येतां ।।२८५।।
तैसें माझ्या रूपीं । मिळोनियां गेले । तयांचे तुटले । सर्व बंध ।।२८६।।
चिरंजीवांमाजीं । जो का सर्वश्रेष्ठ । असे जो वरिष्ठ । विश्वाकारीं ।।२८७।।
[2] लोकत्रयरूप । पर्वताचा माथा । ऐसा जो का पार्था । *सत्यलोक ।।२८८।।
जेथींचिया एका । प्रहरापर्यंत । टिके ना स्वर्गांत । इंद्र एक ।।२८९।।
आणि एक दिन । होतां ऐशा रीती । होवोनियां जाती । चौदा इंद्र ।।२९०।।

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ।।१७।।

जातील सहस्र । वेळां युगें चार । तेव्हां चि साचार । ब्रह्म-दिन ।।२९१।।
चौकड्या सहस्र । तैशा चि आणिक । तेव्हां रात्र एक । सत्यलोकीं ।।२९२।।
दिन आणि रात्र । येथील हीं थोर । देखती अमर । होवोनि जे ।।२९३।।
जाण धनंजया । भाग्यवंत साचे । होती ते स्वर्गींचे । चिरंजीव ।।२९४।।
नाहीं तरी मूळ । इंद्राची ही दशा । होती एक दिसा-। माजीं चौदा ।।२९५।।
मग जे इतर । देवगण पार्था । तयांची [3] प्रतिष्ठा । काय तेथें ।।२९६।।
परी ब्रह्मयाचे । आठ हि प्रहर । देखती जे नर । [4] निजदृष्टी ।।२९७।।
* अहोरात्रविद् । ऐसें तयां नांव । जाण [5] स्वयमेव । ज्ञान चि ते ।।२९८।।

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ।।१८।।

---

१ जन्ममरणाचे फेरे. २ स्वर्ग-मृत्यू-पाताळ. ३ मोठेपणा; डौल. ४ आपल्या डोळ्यांनी. ५ स्वतःच.

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥१९॥

**तया ब्रह्मलोकीं । उगवतां दिन । * अव्यक्तापासोन । स्वभावतां ॥२९९॥**
**जयाची गणना । करवेना ऐसें । येई व्यक्त दशे–। लागीं विश्व ॥३००॥**
**आणि आटे सर्व । आकार-सागर । चार हि प्रहर । लोटतां तें ॥३०१॥**
**मागुतीं पहांट । होतां धनंजया । लागे भरावया । मग पुन्हां ॥३०२॥**
**[1] शरत्कालारंभीं । जैशा मेघ-पंक्ति । जिरोनियां जाती । आकाशांत ॥३०३॥**
**मग [2] ग्रीष्मकाळ । संपता किरीटी । पुन्हां उद्भवती । तेथें चि त्या ॥३०४॥**
**तैसा मिळे भूत–। सृष्टींचा समूह । धनंजया ब्रह्म–। दिनारंभीं ॥३०५॥**
**आणिक सहस्र–। वेळां युगें चार । लोटती तोंवर । राहे चि तो ॥३०६॥**
**मग होतां ब्रह्म–। रात्रीचा समय । विश्व पावे लय । अव्यक्तांत ॥३०७॥**
**आणि ब्रह्म-रात्र । संपोनि सकळ । मग [3] अळुमाळ । उजाडतां ॥३०८॥**
**तैसी च ती पुन्हां । विश्वाची रचना । होतसे अर्जुना । [4] पूर्ववत् ॥३०९॥**
**सत्यलोकांतील । अहोरात्र एक । तयामाजीं देख । धनंजया ॥३१०॥**
**विश्वाची उत्पत्ति । आणिक संहार । होय हें चि सार । सांगितलें ॥३११॥**
**पाहे ब्रह्मयाचें । कैसें थोरपण । कीं तो सांठवण । सृष्टि-बीजा ॥३१२॥**
**ऐसा थोर परी । तया हि शेवटीं । चुके ना किरीटी । जन्म-मृत्यु ॥३१३॥**
**नाहीं तरी सत्य–। लोकींचा हा सारा । असे जो पसारा । त्रैलोक्याचा ॥३१४॥**
**अर्जुना तो मांडे । एकाएकीं जाण । उगवतां दिन । ब्रह्मयाचा ॥३१५॥**
**मग प्राप्त होतां । रात्रीचा समय । तो चि लीन होय । आपोआप ॥३१६॥**
**स्वभावतां ऐसीं । भूतें जेथें होती । तेथें चि पावती । * साम्यावस्था ॥३१७॥**
**सामावतें बीजीं । जैसें वृक्षपण । मेघ होती लीन । आकाशांत ॥३१८॥**
**तैसें अनेकत्व । सामावतें जेथें । बोलती तयातें । 'साम्य' ऐसें ॥३१९॥**

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥२०॥

---

१ शरद् (आश्विन-कार्तिक), ऋतूच्या प्रारंभी. २ उन्हाळा. ३ जरासें; किंचित्. ४ पूर्वीप्रमाणे.
* परिशिष्ट पहा.

तेथें भूत- [१] संज्ञा । उरे चि ना देख । नाहीं न्यूनाधिक । म्हणोनियां ॥३२०॥
मुरोनियां दूध । तें चि होतां दहीं । नामरूप पाहीं । हारपतें ॥३२१॥
तैसा आकाराचा । लोप होतां जाण । लोपे जगपण । जगाचें तें ॥३२२॥
परी ज्या अव्यक्ता–। पासोनि हें झालें । तें तंव राहिलें । जैसेंतैसें ॥३२३॥
तेव्हां चि तयातें । बोलती 'अव्यक्त' । साकारतां 'व्यक्त' । नांव देती ॥३२४॥
एकास्तव एक । [२] सापेक्ष हीं नांवें । पाहतां स्वभावें । वस्तु एक ॥३२५॥
आटवितां जैसा । हेम-अलंकार । लगड साचार । म्हणूं तया ॥३२६॥
मग लगडीचीं । करितां भूषणें । घनाकारपणें । उरे ना ती ॥३२७॥
अर्जुना, लगड । आणि अलंकार । एका चि साचार । सुवर्णाचीं ॥३२८॥
तेविं निराकार । आणिक साकार । दोहोंसी आधार । ब्रह्म एक ॥३२९॥
ब्रह्म ना तें व्यक्त । ब्रह्म ना अव्यक्त । ना तें नाशिवंत । ना तें नित्य ॥३३०॥
व्यक्ताव्यक्त दोन्ही । गिळोनि हे भाव । तें तों स्वयमेव । नित्य-सिद्ध ॥३३१॥
राहे विश्वाकार । होवोनियां पार्था । न लोपे लोपतां । विश्वपण ॥३३२॥
अक्षरें तीं जैसीं । टाकितां पुसोन । न जाय लोपोन । अर्थबोध ॥३३३॥
उदकीं तरंग । होती जाती पाहें । उदक तें आहे । सर्वकाळ ॥३३५॥
तैसें नाशिवंत । भूतमात्रीं देख । अविनाश एक । परब्रह्म ॥३३५॥
किंवा [३] आटतिये । अलंकारीं एक । [४] नाटतें कनक । असे जैसें ॥३३६॥
तैसें मर्त्य जीवां–। माजीं जें अमर । नित्य निरंतर । असे कांहीं ॥३३७॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहु: परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥२१॥

पुरुष: स पर: पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।
यस्यान्त:स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥२२॥

कौतुकें जयातें । म्हणावें अव्यक्त । तरी नाहीं होत । स्तुति तेथें ॥३३८॥
मनबुद्धीलागीं । पार्था, [५] अगोचर । असे जें साचार । म्हणोनियां ॥३३९॥
जयाचें मोडे ना । निराकारपण । साकार होवोन । नटतां हि ॥३४०॥

---

*परिशिष्ट पहा.　१ नांव.　२ एकमेकांवर अवलंबून असलेली.　३ आटणाऱ्या.　४ न आटणारे.
५ न कळण्यासारखे.

ना तरी आकार । लोपोनियां जातां । जयाची नित्यता । बिघडेना ।।३४१।।
म्हणोनि यथार्थ । बोलती साचार । अर्जुना 'अक्षर' । जयालागीं ।।३४२।।
नाहीं पलीकडे । जयाचिया देख । विस्तार आणिक । कशाचा हि ।।३४३।।
म्हणोनियां जया । चैतन्यातें नाम । सर्वथा परम–। गति ऐसें ।।३४४।।
परी सर्व देह–। नगरी व्यापोन । निद्रितासमान । वर्ते जें का ।।३४५।।
करवी ना करी । सर्व हि व्यापारीं । उदासीनापरी । राहे सदा ।।३४६।।
एऱ्हवीं देहाचा । एक हि व्यापार । थांबे ना साचार । धनुर्धरा ।।३४७।।
आपआपुलिया । व्यवहारीं पाहीं । इंद्रियें दहा हि । [1]रहाटती ।।३४८।।
आणि मनोरूप । राजरस्त्यावर । मांडला बाजार । विषयांचा ।।३४९।।
सुखदु:खरूप । जो का [2]अग्रभाग । तयाचा हि भोग । घडे जीवा ।।४५०।।
झोपतां नृपाळ । सुखशय्येवर । राज्य-व्यवहार । काय थांबे ? ।।४५१।।
आपुलाल्या इच्छे –। सारिखी ती प्रजा । वर्ते कपिध्वजा । जैशा रीती ।।३५२।।
तैसे इंद्रियांचे । व्यापार सकळ । तेविं हालचाल । वायूची ती ।।३५३।।
संकल्प-विकल्प–। रूप घेणेंदेणें । आणिक जाणणें । बुद्धीचें हि ।।३५४।।
करवीना परी । ऐसी ही आघवी । होतसे बरवी । देह-क्रिया ।।३५५।।
सूर्य तो अलिप्त । परी प्रकाशांत । वर्तती समस्त । लोक जैसे ।।३५६।।
करितो [3]शयन । देहीं तैसा [4]ईश । म्हणोनि 'पुरुष' । नांव जया ।।३५७।।
एकपत्नीव्रत । सती प्रकृतीशीं । नांव हें जयासी । म्हणोनि हि ।।३५८।।
चार हि वेदांचा । विस्तार अर्जुना । जयाचें देखेना । अंगण हि ।।३५९।।
आणि अति सूक्ष्म । ऐसें जें गगन । होय [5]प्रावरण । तयाचें जो ।।३६०।।
जाणोनि हें जया–। लागीं योगीश्वर । देती परात्पर । ऐसें नांव ।।३६१।।
आणि होती जे का । एकनिष्ठ भक्त । तयांतें शोधीत । येतसे जो ।।३६२।।
काया-वाचा-मनें । परब्रह्माविण । जयां [6]उपासन । दुजें नाहीं ।।३६३।।
अनन्य जे ऐसे । होती उपासक । तयांचें सुपीक । सुक्षेत्र जें ।।३६४।।
पुरुषोत्तमरूप । त्रैलोक्य हें सर्व । ऐसा मनोभाव । निश्चयाचा ।।३६५।।

---

१ वागतात. २ टोंक; शेवट. ३ झोंपून राहतो. ४ ईश्वर; स्वामी. ५ पांघरूण. ६ सेवा; पूजन.

ठेविती जे तयां । आस्तिकांचें जाण । विश्रांतीचें स्थान । असे जें का ॥३६६॥
नाहीं जयांठायीं । * अहंतेचें नांव । तयांचें [1] गौरव । होय जें का ॥३६७॥
आणि त्रिगुणांतें । गेले ओलांडून । तयांचें जें ज्ञान । धनंजया ॥३६८॥
तेविं निष्कामासी । सुखाचें साम्राज्य । असे जें का [2] भोज्य । संतुष्टांचें ॥३६९॥
सोडोनियां सर्व । संसाराची चिंता । शरण सर्वथा । आले मज ॥३७०॥
तयां अनाथांचें । जें का [3] मायपोट । जेथें उजू वाट । भक्तीची च ॥३७१॥
काय हें एकैक । सांगूं धनंजया । विस्तार हा वायां । नको आतां ॥३७२॥
परी ऐक पार्था । जया ठाया जावें । ठाव चि तें व्हावें । ऐसें जें का ॥३७३॥
थंडीची झुळूक । लागतां चि देख । जैसें उष्णोदक । थंड होय ॥३७४॥
किंवा सूर्यापुढें । ठाकतां काळोख । तो चि होय देख । तेजोरूप ॥३७५॥
तैसा संसार हा । जया गांवा जातां । होतसे सर्वथा । मोक्षमय ॥३७६॥
जैसें अग्निमाजीं । घालितां इंधन । तें चि होय जाण । अग्निरूप ॥३७७॥
मग वेगळें तें । [4] नुरे काष्ठपण । जरी निवडून । काढूं म्हणों ॥३७८॥
साखरेचा ऊंस । न होय मागुता । पार्था, करूं जातां । चातुर्यें हि ॥३७९॥
लागतां परीस । लोह तें सुवर्ण । होय परिपूर्ण । सर्वांगें चि ॥३८०॥
मग तयाचें तें । गेलें लोहपण । सांग कैसें कोण । आणूं शके ॥३८१॥
दुधाचें चि तूप । होतां धनंजया । दूधपण तया । मग कैंचें ॥३८२॥
ऐसें एकवेळ । पावतां जें स्थान । जीवासी फिरून । जन्म नाहीं ॥३८३॥
तें माझें [5] परम । साच निजधाम । तुज गूढ [6] वर्म । दाविलें हें ॥३८४॥

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिन: ।
प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥२३॥

पार्था, आणिक हि । एके परी पाहें । सुलभ हें आहे । जाणावया ॥३८५॥
योग्य कालीं निज–। देह ठेवोनियां । जाती मिळोनियां । योगी जेथें ॥३८६॥
माझें परंधाम । तें चि ऐसें जाण । सांगें तुज खूण । अंतरींची ॥३८७॥
किंवा एकाएकीं । अकालीं मरण । तरी जन्म जाण । पुनरपि ॥३८८॥

---

*परिशिष्ट पहा. १ श्रेष्ठत्व. २ जेवण; खाद्य. ३ आश्रयाची जागा. ४ उरत नाहीं.
५ श्रेष्ठ. ६ रहस्य.

शुद्ध काळीं पार्था । ठेवितां चि देह । योगी नि:संदेह । ब्रह्म होती ॥३८९॥
एऱ्हवीं अकालीं । पडे देह तरी । मागुतीं संसारीं । येणें घडे ॥३९०॥
अंतीं पुनर्जन्म । किंवा सायुज्यता । जाणावीं हीं पार्था । कालाधीन ॥३९१॥
त्या चि योग्यायोग्य । कालाचें वर्णन । प्रसंगें करीन । ऐक आतां ॥३९२॥
मृत्यूचिया गुंगी–। माजीं [1] विकलता । देहालागीं येतां । अंतकाळीं ॥३९३॥
चालूं लागती तीं । पंचमहाभूतें । आपुलाल्या वाटे । धनंजया ॥३९४॥
ऐशा हि स्थितींत । [2] अंध नोहे स्मृति । आक्रमी ना भ्रांति । बुद्धीलागीं ॥३९५॥
सावध तें मन । ज्ञानेंद्रियगण । प्रफुल्ल प्रसन्न । असोनियां ॥३९६॥
ब्रह्मभावस्थिति । टिके तया काळीं । जीवें जी भोगिली । स्वानुभवें ॥३९७॥
पार्था, अंतकाल । होय तोंपर्यंत । ऐसीं व्यवस्थित । सर्वेंद्रियें ॥३९८॥
अंगीं अग्निबळ । तरी च हें घडे । ना तरी विघडे । सर्व कांहीं ॥३९९॥
जलें वा [3] अनिलें । मालवतां ज्योति । आपुली असती । दृष्टि व्यर्थ ॥४००॥
तैसा अंतकालीं । अंतर्बाह्य कफ–। वायूचा प्रकोप । होवोनियां ॥४०१॥
विझोनियां जातां । अग्नीची ती [4] दीप्ति । नुरे क्रियाशक्ति । प्राणासी हि ॥४०२॥
मग तेथें बुद्धि । असोनि हि काय । [5] निष्क्रिय ती होय । अग्निविण ॥४०३॥
म्हणोनियां अंतीं । देहीं अग्निविना । अर्जुना, राहे ना । ज्ञानकला ॥४०४॥
तरी देह नव्हे । चिखल तो ओला । जरी अग्नि गेला । देहांतील ॥४०५॥
मग अंधारांत । शोधावें तैसी च । स्थिति होय साच । आयुष्याची ॥४०६॥
आणि सर्व कांहीं । मागील स्मरण । सर्वथा राखोन । तैसें चि तें ॥४०७॥
मग अंतकाळीं । सोडोनि शरीर । मिळावें साचार । आत्मरूपीं ॥४०८॥
तरी कफव्याप्त । देहपंकीं पार्था । बुडोनियां जातां । चेतना ती ॥४०९॥
मागील पुढील । सर्व हि स्मरण । सहजें बुजोन । जाय तेव्हां ॥४१०॥
जैसें ठेवणें तें । न देखतां जावा । हातांतील दिवा । एकाएकीं ॥४११॥
तैसा अंतकाला–। पूर्वीं च लोपला । योगाभ्यास केला । जो का आधीं ॥४१२॥
तरी आतां पार्था । असो हें सकळ । जाण अग्नि मूळ । ज्ञानासी गा ॥४१३॥

---

१ व्याकुळपणा. २ स्वरूपाचें विस्मरण होत नाहीं. ३ वाऱ्यानें. ४ तेज. ५ क्रियाहीन.

म्हणोनि प्रयाण–। काळीं संपूर्णत्वें । शरीरीं असावें । अग्नि-बळ ॥४१४॥

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥२४॥

देहामाजीं अग्नि–। ज्योतीचा प्रकाश । बाहेरी दिवस । शुक्लपक्ष ॥४१५॥
आणि जे षण्मास । उत्तरायणाचे । त्यांतील एकाचें । पाठबळ ॥४१६॥
ऐसा समयोग । साधोनि साचार । आपुलें शरीर । ठेविती जे ॥४१७॥
ब्रह्मवेत्ते पार्था । ब्रह्म चि ते होती । एवढी महती । काळाची ह्या ॥४१८॥
आत्मस्वरूपातें । मिळावया पाहें । सर्वथा हा आहे । उजू मार्ग ॥४१९॥
येथें अग्नि ही च । पहिली पायरी । जाणावी दुसरी । [१]ज्योतिर्मय ॥४२०॥
तेविं दिवस ही । पायरी तृतीय । चवथी ती होय । शुक्लपक्ष ॥४२१॥
*उत्तरायणाचे । मास जे का सहा । सोपान तो पहा । त्या हि वरी ॥४२२॥
अर्जुना, सायुज्य–। सिद्धि-सदनातें । योगी येणें पंथें । पावती गा ॥४२३॥
ह्यासी च * 'अर्चिरा–। मार्ग' ऐसें नाम । काळ हा उत्तम । प्रयाणाचा ॥४२४॥
धनंजया आतां । अकाळ जो येथें । ऐक तो हि तूतें । निवेदीन ॥४२५॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥२५॥

तरी अंतकाळीं । देह व्याधिग्रस्त । कफ-वातें जात । दाटोनियां ॥४२६॥
तिये वेळीं मग । अंधार तो पाहें । भरोनियां राहे । अंतरांत ॥४२७॥
आणि [२]काष्ठवत् । सर्वेंद्रियें होती । तेविं बुडे स्मृति । भ्रमामाजीं ॥४२८॥
मन होय वेडें । आणि कोंडे प्राण । जाय अग्निपण । अग्नीचें हि ॥४२९॥
सर्वत्र तो धूर । भरोनियां ठाके । [३]चेतना हि झांके । तेणें मग ॥४३०॥
नभामाजीं मेघ । जळें परिपूर्ण । ठाकतां [४]दाटोन । चंद्राआड ॥४३१॥
मग ना अंधार । ना तरी उजेड । सर्वत्र [५]धुकड । दिसे जैसें ॥४३२॥
तैसें ना मरण । नाहीं सावधता । येतसे स्तब्धता । जीवितासी ॥४३३॥
ऐशा स्थितीमाजीं । आयुष्य तें पार्था । मृत्यूची सर्वथा । वाट पाहे ॥४३४॥

---

*परिशिष्ट पहा. १ ज्वालारूप. २ लांकडासारखी. ३ जाणीव. ४ भरगच्च.
५ अर्धवट अंधार; धुरकट.

मन बुद्धि आणि । सर्व इंद्रियें तीं । कोंडोनियां जाती । धुरामाजीं ।।४३५।।
आणि जो अभ्यास । जोडला जन्मोन । जाय तो लोपोन । तिये वेळीं ।।४३६।।
मग आणिकाचा । लाभ तो कोठून । जातां हारपून । हातींचें हि ।।४३७।।
अंतकाळीं देहीं । ऐसी दशा होय । रात्रीचा समय । बाहेरी हि ।।४३८।।
कृष्णपक्ष आणि । *दक्षिणायनाचे । षण्मास ते साचे । त्या हि वरी ।।४३९।।
जन्म-मरणाच्या । घालिती फेऱ्यांत । ऐसे हे समस्त । योग जाण ।।४४०।।
पार्था, अंतकाळीं । जुळोनियां येतां । ब्रह्मप्राप्तिवार्ता । दूर राहे ।।४४१।।
जया योगियाचा । ऐसा देह पडे । तया जाणें घडे । चंद्रलोकीं ।।४४२।।
मग तेथोनि तो । फिरोनि माघारा । गांठितसे फेरा । संसाराचा ।।४४३।।
[१]अकाळ म्हणोनि । बोलिला जो आतां । हा चि तो तत्त्वतां । जाण बापा ।।४४४।।
धूम्रमार्ग ऐसें । बोलती ह्यासी च । पाववी जो साच । पुनर्जन्म ।।४४५।।
दुजा अर्चिरादि । मार्ग तो [२]सुगम । सर्वथा उत्तम । मोक्षदायी ।।४४६।।

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतःशाश्वते मते ।
एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽऽवर्तते पुनः ।।२६।।

ऐशा [३]अनादि ह्या । दोन्ही वाटा देख । एक उजू एक । आडमार्ग ।।४४७।।
[४]बुद्धिपुरस्सर । दाखविले दोन्ही । कळावे म्हणोनि । मार्गामार्ग ।।४४८।।
सत्य आणि मिथ्या । पार्था ओळखावें । हितार्थ जाणावें । हिताहित ।।४४९।।
तरावया नाव । देखोनियां भली । कोण उडी घाली । महाडोहीं ।।४५०।।
किंवा राजमार्ग । जाणोनि हि कोणी । सांग आडरानीं । शिरेल का ? ।।४५१।।
अमृत आणिक । विष ओळखील । काय तो सांडील । अमृतातें ? ।।४५२।।
तेविं उजू वाट । देखे जो सर्वथा । न जाय तो पार्था । आडवाटे ।।४५३।।
सत्य आणि मिथ्या । पारखोनि नीट । तरावें संकट । अकाळाचें ।।४५४।।
एऱ्हवीं देहान्तीं । पातली आपत्ति । पडोनियां भ्रांति । मार्गामार्गीं ।।४५५।।
तरी योगाभ्यास । सर्व हि तो देख । होय [५]निरर्थक । धनंजया ।।४५६।।
अर्चिरादि पंथ । चुकोनियां योगी । पडे धूम्रमार्गीं । अकस्मात ।।४५७।।

---

*परिशिष्ट पहा. १ अयोग्य वेळ. २ सोपा. ३ मूळच्याच. ४ जाणून, मुद्दाम. ५ निरुपयोगी, फुकट.

तरी तयालागीं । [१] भवचक्रासंगें । फिरावें चि लागे । वारंवार ॥४५८॥
ऐसे हे सायास । चुकावे म्हणोनि । [२] विवरिले दोन्ही । मार्ग नीट ॥४५९॥
एक तो योग्यातें । ब्रह्मपदा नेई । दुजा फेरा देई । संसाराचा ॥४६०॥
परी अंतकाळीं । जया जो साचार । प्रारब्धानुसार । मिळे मार्ग ॥४६१॥
अर्जुना, तो योगी । तैसी गति पावे । सांगेन बरवें । ऐक आतां ॥४६२॥

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥२७॥

कोण जाणे मार्ग । कोणता लाभेल । येतां अंत:काल । एकाएकीं ॥४६३॥
म्हणोनि देहान्तीं । ब्रह्म व्हावें मार्गें । नको तें वाउगें । अनिश्चित ॥४६४॥
तरी आतां देह । असो किंवा जावो । आपण तों आहों । ब्रह्मरूप ॥४६५॥
दोरीवरी जैसा । सर्पाचा आभास । तैसा मिथ्याभास । शरीराचा ॥४६६॥
काय उदकातें । तरंगाचें भान । तें तों नित्य जाण । उदक चि ॥४६७॥
पावे ना तें जन्म । उसळतां लाट । मरे ना निश्चित । लोपतां ती ॥४६८॥
तेविं जे देहें चि । झाले परब्रह्म । नामरूप-भ्रम । सांडोनियां ॥४६९॥
आतां शरीराचें । तयांचिया ठायीं । आडनांव तें हि । नुरे जेथें ॥४७०॥
तेथें कोणे काळीं । काय मरे पार्था । होतां तो सर्वथा । सर्वरूप ॥४७१॥
देशकालादिक । सर्व जरी तो च । जाहलासे साच । आपण चि ॥४७२॥
कशासाठीं मग । मार्ग ते शोधावे । कोणें कोठें जावें । कोठोनियां ! ॥४७३॥
भंगतां चि घट । त्यांतील आकाश । लागेल वाटेस । नीटपणें ॥४७४॥
तरी च तें काय । शून्यासी भेटेल । ना तरी मुकेल । [३] शून्यत्वासी ? ॥४७५॥
पाहतां विचार । लोपे घटाकार । शून्य तें साचार । शून्यीं असे ॥४७६॥
जया 'अहं ब्रह्म' । ऐसा झाला बोध । योगी सोऽहंसिद्ध । ऐसा जो का ॥४७७॥
तयालागीं मार्गा–। मार्गाचें बिकट । पडेना संकट । कदाकाळीं ॥४७८॥
म्हणोनियां तुवां । व्हावें योगयुक्त । मग अखंडित । [४] ब्रह्मसाम्य ॥४७९॥
ऐसें होतां देह । केव्हां कोठें कैसा । पडो किंवा जैसा–। तैसा राहो ॥४८०॥

---

१ संसाररूपी चक्राबरोबर. २ स्पष्ट करून सांगितले. ३ आकाशपणाला. ४ ब्रह्मरूपता.

परी [१] अनिर्बंध । नित्य ब्रह्मस्थिति । तयाची कल्पान्तीं । बिघडे ना ॥४८१॥
तया [३] कल्पारंभीं । बाधे ना जनन । पावे ना मरण । [३] कल्पान्तीं तो ॥४८२॥
आणि मध्यें स्वर्ग–। संसाराची भूल । परी तो निश्चल । राहे तेथें ॥४८३॥
तो चि ज्ञानाची ह्या । जाणे सरलता । होय ऐसा ज्ञाता । योगी जो का ॥४८४॥
कीं तो सर्व भोग । ओलांडोनि पाहें । होवोनियां राहे । ब्रह्मरूप ॥४८५॥
इंद्रादिकां देवां । सर्वस्व चि वाटे । ऐसें जें का मोठें । स्वर्गसुख ॥४८६॥
तें हि त्याज्य तुच्छ । [२] लेखोनियां पार्था । सहजें सर्वथा । दूर लोटी ॥४८७॥

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥२८॥

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नाम
अष्टमोऽध्यायः ॥८॥

घोकोनियां चारी । वेद अहोरात्र । पिकवोनि क्षेत्र । यज्ञरूप ॥४८८॥
किंवा करोनियां । पार्था, तपोदान । पुण्य-संपादन । करावें जें ॥४८९॥
बहरोनि सर्व । पुण्याचा त्या मळा । जरी फळा आला । परिपूर्ण ॥४९०॥
तरी नित्य शुद्ध । ब्रह्म-स्वरूपाशीं । तुलना ती कैशी । होय त्याची ॥४९१॥
ऐसें नित्यानंदा–। सारिखें आणिक । दिसे स्वर्गसुख । पार्था, जें का ॥४९२॥
तेविं जयाचिया । प्राप्तीसाठीं देख । वेद-यज्ञादिक । साधनें तीं ॥४९३॥
करी भोक्तयाचे । पूर्ण मनोरथ । संपेना अवीट । ऐसें जें का ॥४९४॥
ब्रह्मसुखाचें जें । धाकटें भावंड । देई जें आल्हाद । [३] दर्शनासी ॥४९५॥
असे [४] अदृष्टाचा । जयासी आधार । अर्जुना, साचार । ऐसें जें का ॥४९६॥
तेविं शत यज्ञ । करोनि हि देख । लाधे ना जें सुख । कोणा एकां ॥४९७॥
तया स्वर्ग-सुखा । कौतुकें तोलून । आपुल्या झेलून । हातावरी ॥४९८॥

---

*परिशिष्ट पहा. १ अडथळ्याशिवाय. २ मानून. ३ दृष्टीला. ४ पूर्वजन्मींच्या (पुण्य) कर्माचा.

ज्ञानदृष्टिबळें । पाहतां तें जाण । योगीश्वरा [1] गौण । वाटतसे ।।४९९।।
स्वर्गसुखाची त्या । पायरी करोनि । ब्रह्मसिंहासनीं । बैसती ते ।।५००।।
चराचराचें जो । असे एकभाग्य । पूजावया योग्य । [2] ब्रह्मेशांसी ।।५०१।।
आणि योगियांचें । [3] भोग्य भोग-धन । जीवाचें जीवन । विश्वाचिया ।।५०२।।
तेविं चि सकळ । कळांची जो कळा । ओतीव पुतळा । स्वानंदाचा ।।५०३।।
असे जो का सर्व । ज्ञानांचा [4] जिव्हाळा । यादवांच्या कुळा । उजळिता ।।५०४।।
यादवेंद्र कृष्ण । सर्वज्ञ श्रीपति । ऐसें पार्थाप्रति । बोलिला तो ।।५०५।।
कुरु-क्षेत्रीं ऐसें । घडलें जें तें तें । संजय रायातें । सांगतसे ।।५०६।।
आतां पुढें ऐका । वृत्तांत तो सर्व । म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।५०७।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

अष्टमोऽध्यायः ।

हरये नमः । हरये नमः । हरये नमः ।

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ कमी प्रतीचें.	२ ब्रह्मदेव आणि शंकर यांना.	३ भोगावयाजोगें.	४ जीवनकला.